# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : तक्रार क्र -११८०/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.भूषण काशिराम महाले**

मु.पो.देहरे, ता.जव्हार, जि.पालघर ४०१ ६०३

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय ओंदे
ता.विक्रमगड, जि.पालघर

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय ओंदे
ता.विक्रमगड, जि.पालघर

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१.२०२१ | --- | २.३.२०२१ | ३०.३.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. ४.८.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती देण्यात आली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती. वंदना शशीभूषण प्रसाद, ग्रामसेवक आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती. रक्षा राजेंद्र पाटील, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे या उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (१) ओंदे ग्रामपंचायत अंतर्गत सन २०१८ ते २०१९ या कालावधीत झालेली विकास कामे शासनाचा आलेला निधी व खर्च झालेला निधी याची तपशीलवार माहिती मिळण्याबाबत. (२) ही कामे पूर्ण झाले की अपूर्ण आहेत याची संपूर्ण माहिती मिळण्याबाबत.) "

तदनंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती मिळालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.३.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*(१) अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जी ग्रामपंचायतकडे उपलब्ध आहे ती पूर्ण देण्यात यावी. (२) सदरची माहिती ही २० दिवसात देण्यात यावी त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. (३) सदरची माहिती अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.३.२०२१ रोजी तक्रारकर्ता यांना २० दिवसात माहिती विनामूल्य देण्याबाबत आदेशित केले होते. तथापि, त्या आदेशाची अद्याप पूर्तता केल्याचे दिसून येत नाही. तथापि, माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत तसेच त्यानंतर त्या पदावर कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी म्हणजेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री संदीप भिका सुतार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय ओंदे (सध्या कार्यरत-ग्रामसेवक, ग्रामपंचायत चाबके तलावली, पंचायत समिती विक्रमगड, ता. विक्रमगड, जि. पालघर) यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रुपये २५०/- अधिकतम (रुपये २५,०००/-) इतक्या शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वतः उपस्थित राहून

सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील एका आठवड्याच्या आत विनामूल्य पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गामपंचायत कार्यालय, ओंदे यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील एका आठवडयाच्या आत समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना एक आठवडयाच्या आत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदिप भिका सुतार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे, (सध्या कार्यरत- ग्रामसेवक, ग्रामपंचायत चाबके तलावली, पंचायत समिती विक्रमगड, ता. विक्रमगड, जि. पालघर) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २०.१.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून दि.२२.१०.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. २२.१०.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदिप भिका सुतार, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे, ता.विक्रमगड, जि.पालघर
(सध्या कार्यरत-ग्रामसेवक, ग्रामपंचायत चाबके तलावली, पंचायत समिती विक्रमगड, ता. विक्रमगड, जि. पालघर)
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. रक्षा राजेंद्र पाटील, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय ओंदे, ता.विक्रमगड, जि.पालघर **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -११८०/२०२१**
**तक्रारकर्ता, श्री.भूषण काशिराम महाले**
**सुनावणी दिनांक २२.१०.२०२४ (In continuation of order dt. २९.८.२०२४)**

## विवेचन

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदिप भिकार सुतार, ग्रमसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदीप भिकार सुतार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय ओंदे यांनी दिनांक २२.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असा लेखी खुलासा सादर केला की, त्यांनी दिनांक ४.८.२०२१ रोजी सदरचा कार्यभार स्वीकारला होता. ते दिनांक ६.११.२०२२ पर्यंत उक्त ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत होते. तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गतचा अर्ज केला त्यावेळी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांनी २० दिवसांमध्ये माहिती देण्याचे आदेश पारित केले त्यावेळी ते कार्यरत नव्हते. ***त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी या पदावर श्रीमती. वंदना शशीभूषण प्रसाद, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,ओंदे या कार्यरत होत्या.*** प्रथम अपिल आदेशानंतर त्यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिली होती असेही त्यांनी त्यांच्या लेखी खुलाशामध्ये नमूद केलेले आहे. व आता आयोगाच्या आदेशानंतरदेखील त्यांनी दि.९.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे तक्रारकर्ता यांना पुन्हा एकदा सदरची माहिती पुरविलेली आहे. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदीप

भिकार सुतार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे यांचा खुलासा मान्य करणे उचित होईल. मात्र, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती. वंदना शशीभूषण प्रसाद यांनी तक्रारकर्ता यांना विहित मुदतीत माहिती का पुरविली नाही याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वतः उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदिप भिकार सुतार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून त्यांचा दि.२२.१०.२०२४ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२९.८.२०२४ च्या आदेशातील दिलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.वंदना शशीभूषण प्रसाद, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ओंदे (सध्या कार्यरत- ग्रामसेवक, ग्रामपंचयत कार्यालय, परळी, ता. वाडा, जि. पालघर यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २०.१.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि. २.१.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२.१.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२४

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. वंदना शशीभूषण प्रसाद, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय ओंदे, ता. विक्रमगड, जि. पालघर.
(सध्या कार्यरत- ग्रामसेवक, ग्रामपंचयत कार्यालय, परळी, ता. वाडा, जि. पालघर)
- **यांना प्रत** तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संदिप भिकार सुतार, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय ओंदे, ता. विक्रमगड, जि. पालघर **यांचेमार्फत रवाना.**